Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 01/08/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाटाच्या, आठल्या वाटाच्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष



## कवी, संस्कृतचे प्राध्यापक महादेव कुंटे

महादेव कुंटे हे नामवंत कवी व प्राचीन वाङ्मयाचे अभ्यासक होते. त्यांचा जन्म १ ऑगस्ट १८३५ रोजी माहुली येथे झाला. ते १८५९ मध्ये विल्सन हायस्कूलमधून मॅट्रिक व एल्फिन्स्टन महाविद्यालयामधून बीए झाले. मुंबई सरकारच्या शिक्षण खात्यात नोकरी करताना त्यांची बदली कराची, पुणे, कोल्हापूर येथे प्रमुख अध्यापक म्हणून झाली. कोल्हापूर येथे त्यांनी जुन्या पद्धतीप्रमाणे संस्कृतचा सखोल व व्यापक अभ्यास केला होता. मुंबई व अहमदाबाद येथील सरकारी महाविद्यालयात काही काळ ते संस्कृतचे प्राध्यापक होते. मराठी शिवाय इंग्रजी, संस्कृत, सिंधी, गुजराती या भाषांवर प्रभुत्व असल्यामुळे ते त्या भाषांतून अस्खलित भाषण करीत. ग्रीक, पर्शियन व लॅटिन भाषांचेही ते जाणकार होते.

कुंटे यांची ख्याती 'राजा शिवाजी' या रचनेच्या दृष्टीने अपूर्ण पण अभिव्यक्तीदृष्ट्या अपूर्व काव्यामुळे विशेष झाली. 'अशिक्षित व सुशिक्षित यांना राष्ट्रहितासाठी एकत्र आणले पाहिजे. यासाठी सर्वांना समजेल व आवडेल अशा सरळ व नित्य व्यवहारातील भाषेचा प्रयोग केला पाहिजे.' संस्कृतनिष्ठ भाषाभिमानी पुणेरी पंडितांचा आदर्श मोडल्यामुळे कुंटे यांच्यावर खूप टीका झाली होती. उच्चारानुसारी भाषेची ही 'छान तर्वार उप्सून' आलेल्या त्यांच्या 'राजा शिवाजी'चा सामना 'मराठी भाषेच्या शिवाजी'शी झाला. स्वतंत्र काव्यदृष्टीने जाणीवपूर्वक 'रोमँटिक स्टाइल'मध्ये काव्य लिहिणारा त्या काळातील हा एकमेव कवी होय. कुंटे यांनी 'राजा शिवाजी'वर सोप्या भाषेत महाकाव्य लिहिण्याचा अभिनव प्रयोग केला. कुंटे यांनी 'मन' या नावाचे २५५ श्लोकांचे काव्य रचून १८७२ साली प्रसिद्ध केले होते. तसेच 'ऋषी' नावाचे ७७० ओळींचे काव्य इंग्रजीत लिहून १८७८ मध्ये प्रसिद्ध केले. महादेव कुंटे यांचे ८ ऑक्टोबर १८८८ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Aug 01, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401